UFO
CINE MEDIA NETWORK

Publication: Loksatta
Date: 23/04/2020

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# ‘यूएफओ मुव्हीज’ची १५० कोटींची उलाढाल ठप्प

रेश्मा राईकवार, लोकसत्ता

## नवे व्यासपीठ विकसित करण्याचा प्रयत्न

**मुंबई :** देशभरात उपग्रहाच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सिनेमा पोहोचवणाऱ्या यूएफओ मुव्हीजला करोनामुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे. टाळेबंदीमुळे चित्रपटगृहेच बंद असल्याने कंपनीचे १५० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत जनजीवन पूर्वपदावर येईपर्यंत केवळ चित्रपटांवर अवलंबून न राहता काही नवे व्यासपीठ विकसित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती यूएफओचे व्यवस्थापकीय संचालक संजय गायकवाड यांनी ‘लोकसत्ता’ला दिली.

‘करोनाचा संसर्ग वाढू नये म्हणून मार्च महिन्यातच चित्रपटगृहे बंद करण्यात आली. त्यातच मार्चचे पहिले दोन-तीन आठवडे चित्रपट प्रदर्शित झाले होते. त्यामुळे आमचा महसूल सुरू होता. आता ३ मे पर्यंत देशभरात टाळेबंदीचा कालावधी वाढवण्यात आला असल्याने पुढचे कमीत कमी तीन महिने आम्हाला कोणत्याही प्रकारे महसूल मिळणार नाही’, असे गायकवाड यांनी सांगितले.

सिनेमा वितरण, जाहिरातीत अग्रेसर असलेल्या यूएफओ मुव्हीजला तीन प्रकारे महसूल मिळतो. चित्रपटगृहांमध्ये सिनेमा वितरणातून मिळणारा पैसा, सिनेमा प्रक्षेपणासाठी आवश्यक उपकरणांच्या भाडेतत्वापोटी मिळणारी रक्कम आणि जाहिरातीतून येणारी रक्कम मिळून कंपनीची उलाढाल सुरू असते. मात्र सध्या चित्रपटगृहेच बंद असल्याने महसूल शून्यावर पोहोचला असल्याचे संजय गायकवाड यांनी सांगितले.

टाळेबंदी उठली तरी चित्रपट पाहायला जाण्यासाठी लोक मनाने तयार नसतील. त्यामुळे एकू णच चित्रपट उद्योगाची गजबज नेहमीप्रमाणे सुरू होण्यासाठी पुढचे किमान सहा महिने जातील, असा अंदाज व्यक्त करत, कंपनीने नवीन पर्याय चाचपडण्यास सुरुवात केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

सिनेमा व्यतिरिक्त जाहिरात क्षेत्रात तसेच तंत्रज्ञानाच्या बाबतीतही आमच्याकडे कुशल लोक आहेत, त्यामुळे त्यांच्या मदतीने मनोरंजन क्षेत्रातच काही नवे उपक्रम घेऊन आम्ही येऊ. जेणेकरून पुढील काही महिने सिनेमे प्रदर्शित झाले नाहीत तरी आम्हाला योग्यरितीने मार्गक्रमण करता येईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.




यूएफओचे व्यवस्थापकीय संचालक संजय गायकवाड.

## कंपनीतील कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर

कंपनीचा महसूल पूर्णपणे थांबला असला तरी आमच्या वार्षिक अडीच लाख रुपयांपेक्षा कमी वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर काही परिणाम होणार नाही, याची काळजी घेतली असल्याचे यूएफओचे व्यवस्थापकीय संचालक संजय गायकवाड यांनी सांगितले. त्यासाठी कंपनीच्या दैनंदिन खर्चात कपात करण्यात असून कंपनीतील वरिष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनात काही प्रमाणात कपात करण्यात आली आहे. यामुळे पुढचे कमीत कमी तीन - चार महिने कोणतेही उत्पन्न नसताना काम चालवता येईल आणि कनिष्ठ कर्मचाऱ्यांनाही आर्थिक फटका बसणार नाही यापध्दतीचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.